# १ अपेडा पुरस्कृत अर्थसहाय्य योजना

| घटक | अर्थसहाय्याची मर्यादा |
|---|---|
| १) बाजारपेठ विकासासाठी योजना :<br>अ) **सुधारीत पॅकेजिंगकरिता**<br>**घटक क्र. १**<br>पॅकेजिंगमध्ये नवीन निकषांनुसार उत्पादन व डिझाईन यांचा विकास पॅकेजिंग गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी | १०० टक्के अर्थसहाय्य (अंतर्गत योजना) |
| **घटक क्र. २**<br>अपेडा यांनी निर्धारीत केलेल्या निकषांनुसार पॅकेजिंग प्रमाणकांवर आधारीत साधनांचा वापर करणे | नोंदणीकृत फळे, भाजीपाला, फुले व अंडी निर्यातदारांना खर्चाच्या २५ टक्के अथवा कमाल रु. ५/- लाख मर्यादेपर्यंत |
| ब) **सर्वेक्षण, सल्लासेवा आणि फिजिबिलीटी अभ्यास व संकलित माहितीचे अपग्रेडेशन**<br>**घटक क्र. १**<br>उत्पादन व सुविधांवर आधारीत बाजार माहितीचा विकास आणि प्रसार | १०० टक्के अंमलबजावणी अपेडामार्फत केल्यास |
| **घटक क्र. २**<br>बाजारपेठेच्या अभ्यासाकरिता सहाय्य | प्रतिलाभार्थी - एकूण खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल रु. ५/- लाख मर्यादेपर्यंत (एमडीए/एएआय यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार) |
| संघ/शिखर संस्था/मंडळे/शासकीय निमशासकीय संस्था आदी निर्यातदार सभासदांच्या फायद्यासाठी केलेले सर्वेक्षण अथवा फिसिबिलिटी अभ्यास दौऱ्याच्या आयोजनाकरिता अर्थसहाय्य | एमडीए यांच्या मार्गदर्शक तत्त्वावर आधारीत |
| क) **निर्यातवृद्धी व बाजारपेठ विकास**<br>**घटक क्र १**<br>अपेडा आयोजित वा पुरस्कृत प्रदर्शन/मेळा/कार्यक्रमांसाठी माल मालाचे नमुने, उत्पादनाचे साहित्य पाठविणे, जाहिरात-प्रसिद्धी, वेबसाईट विकासासाठी अर्थसहाय्य. | १०० टक्के अंमलबजावणी अपेडामार्फत केल्यास |
| **घटक क्र. २**<br>उत्पादनाबाबत माहितीची छपाई, जाहिरात - प्रसिद्धी वा प्रसार करणे तसेच फिल्म तयार करणे | १०० टक्के अंमलबजावणी अपेडामार्फत केल्यास |
| **घटक क्र. ३**<br>जाहिरातीद्वारे ब्रँडची प्रचार व प्रसिद्धी करणे (फक्त भारतीय उत्पादनासाठी) आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांद्वारे वा वेबसाईटद्वारे भारतीय ब्रँडचा प्रचार व प्रसार करणे | अपेडाच्या निकषांनुसार, एकूण खर्चाच्या २५ टक्के अथवा रु. ५०/- लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती (वित्त विभागाच्या छाननीनंतर) एकाच निर्यातदारास सलग ३ वर्षांपेक्षा जास्त लाभ घेता येणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | **घटक क्र. ४**<br>अपेडा यांच्या सहकार्याने निर्यातवृद्धीअंतर्गत खरेदीदार विक्रीदार मेळा (बायर्स - सेलर्स मीट), उत्पादनाची प्रसिद्धी-प्रचार, प्रदर्शन (व्यापारी मेळा) यात सहभाग घेणे, आंतरराष्ट्रीय तज्ञांची परस्परातील माहिती घेण्यासाठी अदलाबदल करणे | अपेडासाठी १०० टक्के<br>निर्यातदारांसाठी बाजार विकास कार्यक्रमांतर्गत निर्धारीत मार्गदर्शक सुचनांनुसार |
| | **घटक क्र. ५**<br>भारतीय कृषी आणि प्रक्रियायुक्त पदार्थांना व्यापक प्रसिद्धी देणे | अपेडा यांचेसाठी १०० टक्के निर्यातदारांसाठी बाजार विकास कार्यक्रमांतर्गत निर्धारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार |
| २) | पायाभूत सुविधांच्या उभारणींसाठी अर्थसहाय्य योजना : | |
| | **भाग १**<br>पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी अपेडा, शासकीय संस्था वा सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या जसे की एअर पोर्ट एथॉरिटी ऑफ इंडिया पोर्ट ट्रस्ट इ. | १०० टक्के अनुदान |
| | **भाग २**<br>अ) फळे-भाजीपाला, फुले, उत्पादने यांच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र वाहन व्यवस्थेसाठी अर्थसहाय्य | प्रतिलाभार्थी - एकूण खर्चाच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. २.५ लाख मर्यादेपर्यंत |
| | ब) निर्यातदार/शेतकरी/उत्पादक/सहकारी संस्था/फेडरेशन यांच्या फलोत्पादन व फुलोत्पादन क्षेत्राकरिता | |
| १) | यांत्रिक मशिनरीच्या सहाय्याने काढणी करणे | प्रतिलाभार्थी - एकूण खर्चाच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. ५ लाख मर्यादेपर्यंत. |
| २) | फार्मवर कृषिमालाच्या अंतर्गत ग्रेडिंग, स्वच्छता व साठवणूक याकरिता साठवणूक उभारणे | प्रतिलाभार्थ्यास मशिनरीच्या एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. ५ लाख मर्यादेपर्यंत. |
| ३) | अ) कृषिमालासाठी अत्याधुनिक हाताळणी यंत्रासह ग्रेडिंग, वॉशिंग, वॅक्सिंग, रायपनिंग, पॅकिंग व पॅलेटायझशेन करिता पॅकहाऊस बांधणे. | प्रतिलाभार्थ्यास सर्व मशिनरीच्या एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. १० लाख मर्यादेपर्यंत. |
| | ब) अत्याधुनिक हाताळणी यंत्रासह प्रशीतकरणगृह व शीतकरण गृह उभारणे | प्रतिलाभार्थ्यास सर्व मशिनरीच्या एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. १० लाख मर्यादेपर्यंत. |
| | क) कृषिमाल निर्यातीपूर्वी आवश्यक धुरीकरण, एक्स-रे स्क्रिनींग, हॉट वॉटर ट्रिटमेंट आणि वॉटर सॉफ्टनिंग प्लॅन्टकरिता अर्थसहाय्य | प्रतिलाभार्थ्यास सर्व मशिनरीच्या एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. १० लाख मर्यादेपर्यंत. |
| | ड) एकात्मिक काढणे पश्चात हाताळणी केंद्र उभारणे (पॅकहाऊस व ग्रीनहाऊस दोन्ही वा दोन्हीपैकी एक उभारणीकरिता अर्थसहाय्य) | प्रतिलाभार्थ्यास एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. २५ लाख मर्यादेपर्यंत. |
| | इ) व्हेपर हिट (ट्रिटमेंट, इलेक्ट्रॉनिक बीम प्रोसेसिंग, विकिरण प्रक्रिया केंद्र) उभारणीसाठी अर्थसहाय्य | प्रतिलाभार्थ्यास एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. २५ लाख मर्यादेपर्यंत. |

| | |
|---|---|
| फ) वातावरण नियंत्रण प्रणाली उभारणीकरिता (उदा. प्रदूषण नियंत्रण, मैला पाणी शुद्धीकरण केंद्र) अर्थसहाय्य | प्रतिलाभार्थ्यास एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. २५ लाख मर्यादेपर्यंत. |
| ज) विशेष कोल्ड स्टोरेज जसे की उच्च आर्द्रतेचे शीतगृह, कंट्रोल ॲडमॉस्फिअर, मॉडिफाईड कंट्रोल ॲडमॉस्फिअर, डीप फ्रिझर आदींची उभारणी करणे. | प्रतिलाभार्थ्यास एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. १० लाख मर्यादेपर्यंत. |

## ३) गुणवत्ता व विकास यासाठी अर्थसाहाय्य योजना :

| | |
|---|---|
| **अ) गुणवत्ता व गुणवत्ता नियंत्रण**<br>**घटक क्र. १**<br>प्रयोगशाळा उभारणी/बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य | प्रतिलाभार्थ्यास एकूण किंमतीच्या २५ टक्के अथवा रक्कम रु. २० लाख मर्यादेपर्यंत, पात्र लाभार्थ्याने सर्व गुणवत्ता निकषांचे पालन करणे बंधनकारक आहे. |
| **घटक क्र. २**<br>गुणवत्ता व्यवस्थापन, गुणवत्तेची खात्री व गुणवत्ता नियंत्रण पद्धती जसे की, आयएसओ, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट, हॅसप, कोशर, बीआरसी, गुड ॲग्रीकल्चर प्रॅक्टिस, सेंद्रीय प्रमाणिकरण व इआरपी वर आधारीत यंत्रणा इ. च्या सल्ला फी, गुणवत्ता सुधारणा व प्रमाणीकीकरण यासह. | प्रतिलाभार्थ्यास एकूण किंमतीच्या ५० टक्के अथवा रक्कम रु. ५ लाख मर्यादेपर्यंत |
| **घटक क्र. ३**<br>कृषिमालाची प्रमाणके, गुणवत्ता नियंत्रण निकष ठरविणे यासाठी गुणवत्तेची खात्री करून स्वतंत्र मॅन्युअल, गाईडलाईन्स, डॉक्युमेंटस तयार करणे, मानके - प्रमाणकांमध्ये सुधारणा व प्रयोगशाळांचे प्रमाणीकरण करणे. किटकनाशके व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रमाणकांबाबत अनुषंगिक कामकाज करणे. | १०० टक्के (फक्त अपेडासाठी) |
| **घटक क्र. ४**<br>निर्यातयोग्य कृषिमालाच्या तपासणीसाठी प्रयोगशाळांचे प्रमाणिकरण/बळकटीकरण करणे | १) खाजगी प्रयोगशाळांसाठी - खर्चाच्या ५० टक्के<br>२) केंद्रशासनाच्या प्रयोगशाळांसाठी - खर्चाच्या १०० टक्के<br>३) राज्यशासन/विद्यापीठांच्या प्रयोगशाळांसाठी - खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ५० लाख मर्यादेपर्यंत. |
| **घटक क्र. ५**<br>पाणी, माती, उर्वरीत किटकनाशके अंश तपासणी, संप्रेरके, टॉक्झीन्स, कृषिमालातील (फळे, भाजीपाला, प्रक्रियायुक्त पदार्थ, फुले, कडधान्ये, पशुजन्य पदार्थ यातील) जड मूलद्रव्ये यांच्या तपासणीसाठी अर्थसहाय्य | एकूण खर्चाच्या ५० टक्के वा रु. ५,०००/- प्रतिनमुना या मर्यादेपर्यंत (अपेडाच्या पूर्वमान्यतेने) ही योजना फक्त ज्या पिकांचा किटकनाशके नियंत्रण कार्यक्रमाच्या योजनेत समावेश केला आहे त्यासाठी लागू. |

| | |
|---|---|
| **ब) क्षमतावृद्धी व संस्था व्यवस्थापन**<br>**घटक क्र. १**<br>तांत्रिक व व्यवस्थापकीय गुणवत्तेत वाढ करण्यासाठी भारतात वा विदेशात प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य | अपेडाने अशाप्रकारे कार्यक्रम आयोजित केल्यास खर्चाच्या १०० टक्के, प्रतिप्रतिनिधी खर्च मर्यादा रु. १.५ लाख (एका संस्थेतून तीनपेक्षा जास्त प्रतिनिधी नसावेत) |
| **घटक क्र. २**<br>सेमिनार/कार्यशाळेचे आयोजन तसेच देशांतर्गत अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसहाय्य आणि अनुषंगिक साहित्य तयार करणे | एकूण खर्चाच्या ५० टक्के वा देशपातळीवर सॅमिनारचे आयोजन केल्यास रु. १ लाख व आंतरराष्ट्रीय पातळीवर रु. २ लाख मर्यादिपर्यंत. |
| **घटक क्र. ३**<br>अपेडा आयोजित सेमिनार/कार्यशाळा | १०० टक्के अर्थसहाय्य |
| **घटक क्र. ४**<br>अपेडा आयोजित किंवा अपेडा आणि निर्यातदार असोसिएशन पुरस्कृत आंतरराष्ट्रीय अभ्यासदौऱ्यासाठी अर्थसाहाय्य योजना | अपेडा पुरस्कृत अभ्यासदौऱ्यासाठी १०० टक्के |

४) संशोधन व विकास यासाठी योजना :

| | |
|---|---|
| **घटक क्र. १**<br>शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन संस्थांच्या मदतीने संशोधन व विकास या अंतर्गत नवीन तंत्रज्ञान विकसित करणे | अपेडामार्फत १०० टक्के |
| **घटक क्र. २**<br>कृषिमालाच्या निर्यातीवृद्धीसाठी संशोधन व विकास या अंतर्गत खाजगी/सहकारी क्षेत्रातील संस्थांना तसेच नोंदणीकृत निर्यातदार वा अशोशिएशन यांना मदत करणे | प्रतिलाभार्थ्यास एकूण प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के अथवा रक्कम रु. २० लाख मर्यादिपर्यंत |

●●●